क्रमांक : प्र/आस्था (४)/४५२३/२३-२४ दिनांक :

प्रति,

**विषय : प्राधिकरणाच्या नवीन इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनींचे दुरूस्ती व देखभालीचे तसेच कराव्या लागण-या वायरिंगसाठी वार्षिक कंत्राट करणेबाबत.**

महोदय,

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयाच्या नवीन इमारतीमधील ४०० + विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनी यंत्राचे दुरूस्ती व देखभालीचे वार्षिक कंत्राट करणेबाबत निविदा/दरपत्रक मागवित आहे. पुरवठादाराने दरपत्रक बंद लिफाफ्यातून खालील पत्यावर कार्यालयीन वेळेत **दि. २५ ऑगस्ट, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** किंवा त्यापूर्वी सादर करावे. अंतीम दिनांका नंतर प्राप्त दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

२. प्राधिकरणातील नवीन इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनींचे दुरूस्ती व देखभालीचे तसेच कराव्या लागण-या वायरिंगसाठी संबंधीची माहिती खालील तक्त्यात नमुद करण्यात आली आहे :-

| **अनु.क्र.** | **तपशिल** | **रक्कम (रू.)** |
|---|---|---|
| १ | प्राधिकरणाच्या नवीन इमारतीमधील ४०० + विस्तारीत दुरध्वनी, थेट दूरध्वनी, पीए टू बॉस दूरध्वनी यंत्रांची किरकोळ दूरूस्ती, साफसफाई, दूरध्वनी वायरिंग अथवा अन्य तांत्रिक दोष, तक्रार (किरकोळ तुटलेल्या वायर जोडणे, पुनर्जोडणी (fitting), दूरध्वनी संच एकाच विभागात स्थानांतर करणे, रोजेक्ट बॉक्स, दूरध्वनी दुरूस्ती,आवाजातील अडथळे, दूरध्वनी क्रमांक समांतर जोडणी इ. कामे समाविष्ट राहतील. | |
| | + GST १८% | |
| | **एकूण रक्कम** | |
| २ | दूरध्वनी यंत्रेसामुग्री व किरकोळ वायरिंग करिता जास्त सुटे भाग लागल्यास बाजार भावानुसार ( Market Rate) खर्च अदा केला जाईल. | |

३. नवीन इमारतीमधील विस्तारीत दूरध्वनी आणि थेट दूरध्वनींचे दुरूस्ती व देखभालीचे तसेच करावया लागणा-या वायरिंगसाठी वार्षिक कंत्राटाच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील:-

(१) सदर वार्षिक सर्वंकष देखभाल व दुरूस्ती कंत्राटाचा कालावधी पुढील एक वर्षाकरीता राहिल.

(२) दरपत्रक कागदपत्रात कोठही खाडाखोड, Owerwriting पांढरी शाई लावणे टाळावे.

(३) सदर वार्षिक कंत्राटामध्ये प्रत्येकी तीन महिन्यास देय असलेला देखभाल व दुरूस्तीबाबतचा सेवा अहवाल (Service Report) सादर केल्यानंतर देय असलेली रक्कम प्रत्येकी सहा महिन्यांनी अदा करण्यात येईल.

(४) देखभाल दुरूस्तीकरीता ज्यावेळी दूरध्वनी, वायरींग, अथवा अन्य तांत्रिक दोषासाठी आवश्यकता भासल्यास तातडीच्या प्रसंगी सूचना मिळताच अल्प कालावधीत मेकॅनिकची सेवा उपलब्ध करणे आपणांवर बंधनकारक राहिल.

(५) तसेच कार्यालयातील दूरध्वनी यंत्र किंवा वायरींग ना-दुरूस्त असल्याबाबत कळविल्यानंतर कार्यालयात येणा-या मेकॅनिकला कोणताही खर्च अदा केला जाणार नाही.

(६) वापरात येणारे वायर, केबल, रोजेट बॉक्स व दूरध्वनी यंत्रांचे सुटे भाग इत्यादींचा दर्जा उत्कृष्ट प्रकारचा असणे आवश्यक राहिल.

(७) दर नमुद करताना मुळ किंमत व त्यावरील GST अशी स्वतंत्र किंमत नमुद करुन सादर करावेत.

(८) हे प्राधिकरण कोणत्याही कारणाशिवाय कोणतीही निविदा/दरपत्रक फेटाळण्याचे हक्क राखुन ठेवीत आहे.

सचिव,
कार्यकारी समिती